मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » मंगळवार, दि. 10 मार्च 2026 | पान- 1

# पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कामकाजाला गती

## चार वर्षांनंतर पदाधिकाऱ्यांची निवड पूर्ण; प्रलंबित कामे व प्रकल्प मार्गी लागण्याची अपेक्षा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या महापौर, उपमहापौरांसह विविध विषय समिती सभापतींची निवड प्रक्रिया पूर्ण झाली आहे. सर्व पदाधिकाऱ्यांची निवड प्रक्रिया पूर्ण झाल्याने तब्बल चार वर्षानंतर महापालिकेच्या दैनंदिन कामकाजाला अधिक गती मिळाली आहे. महापालिकेत पदाधिकाऱ्यांसह नगरसेवक, त्यांचे समर्थक, सामाजिक कार्यकर्ते तसेच, नागरिकांची राबता वाढला आहे. प्रशासकीय राजवटीत रेंगाळलेली तसेच, प्रलंबित कामे व प्रकल्प मार्गी लागतील, अशी अपेक्षा शहरवासीयांकडून केली जात आहे

महापालिकेची निवडणूक 15 जानेवारी 2026 ला झाली. महापालिकेत सलग दुसऱ्यांदा भाजपाची सत्ता आली. महापौरपदी रवी लांडगे व उपमहापौरपदी शर्मिला बाबर यांची बिनविरोध निवड 6 फेब्रुवारीला झाली. तसेच, सत्तारूढ पक्षनेतेपदी प्रशांत शितोळे आणि विरोधी पक्षनेतेमध्ये भाऊसाहेब भोईर यांची नियुक्त झाली. स्थायी समिती



### पूर्णवेळ आयुक्त नसल्याने मोठे निर्णय 'स्टॉप'

» सध्या महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर हे महापालिकेचे प्रभारी आयुक्त आहेत. ते आठवड्यातून एकदाच महापालिकेत येतात. धोरणात्मक निर्णय, मोठे प्रकल्प, पदोन्नती, खातेनिहाय चौकशी, कारवाई आदी फाईलीवर ते सह्या करत नाहीत. महापौरांची निवड होऊन महिना लोटला तरी, कामकाजाला पाहिजे तशी गती मिळाली नसल्याने अधिकारी तसेच, पदाधिकारी खासगीत नाराजी व्यक्त करत आहेत. सह्या न करणारे आयुक्त तातडीने बदला. महापालिकेसाठी पूर्ण वेळ आयुक्त नेमण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली आहे. पूर्णवेळ आयुक्त कधी मिळणार, त्याची चर्चा महापालिका वर्तुळात आहे.

अध्यक्षपदी अभिषेक बारणे यांची 28 फेब्रुवारीला निवड झाली. तसेच, विविध विषय समिती सभापतींची निवड सोमवार (दि. 1) झाली.

सभापतींनी आपआपल्या विभागांतील कामांचा आढावा घेऊन कामकाज सुरू केले आहे. शहरात आवश्यक ठिकाणी पाहणी दौरेही केले जात आहेत. सभापती तसेच, समिती सदस्य आणि नगरसेवक ॲक्टिंग मोडमध्ये आहेत. त्यांच्याकडून अधिकाऱ्यांसोबत पाहणी करून प्रभागातील समस्या सोडविण्यावर भर दिला जात आहे. परिणामी, प्रलंबित, रखडलेली कामे व प्रकल्पांना गती मिळताना दिसत आहे.

### दालने सुशोभीकरणास सुरुवात

» नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी आपले दालने सुशोभिकरणास सुरुवात केली आहे. खुर्च्या, सोफे बदलून नवे घेण्यात आले आहेत. तर, अंतर्गत सजावट करण्यात येत आहे. त्यामुळे पदाधिकार्यांचे दालने चमकू लागली आहेत. तसेच, दालनाच्या दर्शनी भागांत भाजप नेत्यांची छायाचित्रे झळकू लागली आहेत. मागील पंचवार्षिकेतील पदाधिकाऱ्यांनी आपआपल्या दालनाचे सुशोभिकरण करून घेतले होते.

### जनसंवाद कायम ठेवण्याची मागणी

» प्रशासकीय राजवटीत तत्कालीन आयुक्त राजेश पाटील यांनी नागरिकांसाठी आठ क्षेत्रीय कार्यालयनिहाय दर सोमवारी जनसंवाद सभेला सुरुवात केली होती. जनसंवाद सभा बंद न करता ती कायम ठेवावी. त्या प्रकारे महापौर पदाधिकारी तसेच, सभापतींनी जनसंवाद घ्यावा. नागरिकांचे प्रश्न, अडचणी व समस्या समजून घ्याव्यात, अशी मागणी केली जात आहेत.

---

# वायू प्रदूषण नियंत्रणासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेची कठोर पावले

## आरएमसी प्लांट व बांधकाम साहित्य पुरवठादारांना महापालिकेचे आदेश; नियमभंग करणाऱ्यांवर कारवाईचा इशारा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरातील वाढत्या वायू प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागामार्फत विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. शहरातील आर.एम.सी. प्लांट, बांधकाम स्थळे तसेच बांधकाम साहित्य साठवणूक ठिकाणी धूळ व वायू प्रदूषण रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करणे बंधनकारक करण्यात आले आहे.



महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या दिनांक १७ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या परिपत्रकानुसार आर.एम.सी. प्लांट तसेच बांधकाम स्थळांवर धूळ नियंत्रणासाठी ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे. मात्र काही ठिकाणी या सूचनांचे पालन होत नसल्याचे महानगरपालिकेच्या निदर्शनास आले आहे.

पिंपरी चिंचवड शहरातील वायू गुणवत्ता निर्देशांक मोजणी केंद्रांच्या नोंदीनुसार शहरातील हवेची गुणवत्ता सध्या मध्यम १०० ते १५०) या श्रेणीत असल्याचे दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर सर्व आर.एम.सी. प्लांट धारक, बांधकाम व्यावसायिक तसेच बांधकाम साहित्य पुरवठादार यांनी धूळ व वायू प्रदूषण नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना तात्काळ कराव्यात, असे आवाहन पिंपरी चिंचवड मनपामार्फत करण्यात आले आहे. संबंधित आस्थापनांची महानगरपालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयामार्फत नियमित तपासणी करण्यात येणार असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. तसेच जोपर्यंत जोपर्यंत सदर उपाययोजना करण्यात येत नाही तोपर्यंत आस्थापना बंद ठेवण्यात येणार आहेत. गरज भासल्यास संबंधित आस्थापना सील करण्याची कारवाई देखील करण्यात येईल, असा इशाराही पर्यावरण विभागाचे मुख्य अभियंता संजय कुलकर्णी यांनी दिला आहे.

# प्रत्येक महिलेने स्वत:साठी वेळ काढून छंद जोपासावेत : उपमहापौर शर्मिला बाबर

## महिला दिनानिमित्त महापालिकेच्या महिला कर्मचाऱ्यांसाठी विशेष कार्यक्रम; आरोग्य, समुपदेशन व सांस्कृतिक उपक्रमांवर भर

**पिंपरी | प्रतिनिधी**

महिला कर्मचाऱ्यांनी आपल्या कर्तव्याला प्राधान्य देत जबाबदाऱ्या पार पाडताना स्वतःच्या आरोग्याकडे आणि वैयक्तिक आयुष्याकडेही तितक्याच गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. कामाच्या धकाधकीत अनेकदा महिला स्वतःकडे दुर्लक्ष करतात, मात्र निरोगी शरीर आणि सकारात्मक मन असेल तरच त्या कुटुंब, समाज आणि कार्यस्थळी अधिक सक्षमपणे योगदान देऊ शकतात. त्यामुळे महिलांनी आपल्या दैनंदिन दिनक्रमात आरोग्याची काळजी घेणे, नियमित व्यायाम करणे आणि मानसिक तणावापासून दूर राहण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर प्रत्येक महिलेने दिवसातून थोडा तरी वेळ स्वतःसाठी राखून ठेवत आवडत्या गोष्टींमध्ये वेळ घालवावा. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला नवी ऊर्जा आणि सकारात्मकता मिळू शकेल, असे प्रतिपादन उपमहापौर शर्मिला बाबर यांनी केले.




जागतिक महिला दिनानिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने महिला कर्मचाऱ्यांसाठी चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी मनोगत व्यक्त करताना उपमहापौर शर्मिला बाबर बोलत होत्या.

या कार्यक्रमास स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, क्रीडा, कला, सांस्कृतिक व साहित्य समितीचे सभापती कैलास कुटे, महिला व बालकल्याण समिती सभापती राणी पठारे, नगरसदस्या अनुराधा गोरखे, पल्लवी वाल्हेकर,प्रियांका कुदळे यांच्यासह सहआयुक्त मनोज लोणकर, सहशहर अभियंता प्रेरणा सिनकर, उपआयुक्त चेतना केरूरे, संदीप खोत, मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह महापालिका महिला अधिकारी,महिला कार्यकारी अभियंता तसेच कर्मचारी उपस्थित होत्या.

स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे म्हणाले, महापालिकेत कार्यरत असलेल्या सर्व महिला कर्मचारी माझ्यासाठी भगिनींसारख्या आहेत. त्या विविध विभागांमध्ये जबाबदाऱ्या पार पाडत शहराच्या प्रशासनात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. कामाच्या ठिकाणी त्यांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी येत असतील किंवा कोणत्याही बाबतीत सहकार्याची आवश्यकता भासत असेल, तर त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहून मदत करण्यासाठी मी व माझे सहकारी पदाधिकारी सदैव तत्पर आहोत. महिला कर्मचाऱ्यांना सुरक्षित, सन्मानपूर्ण आणि सकारात्मक कार्यपरिसर मिळणे ही प्रशासनाची सामूहिक जबाबदारी आहे. महानगरपालिकेतील महिला कर्मचारीही आपल्या प्रामाणिक आणि कर्तव्यनिष्ठ कामामुळे शहराच्या विकासात मोलाचा वाटा उचलत आहेत. त्यांच्या या कार्याचा गौरव करत सभापती बारणे यांनी सर्व महिला कर्मचाऱ्यांना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

महिला सक्षमीकरण ही केवळ घोषणांपुरती मर्यादित राहू नये, तर त्यासाठी सातत्यपूर्ण उपक्रमांची गरज आहे. त्यामुळे पुढील वर्षी साजऱ्या होणाऱ्या जागतिक महिला दिनाचे नियोजन आतापासूनच करण्याचा मानस आहे. सांस्कृतिक कार्यक्रमांसोबतच महिलांना विचार मांडता येतील, त्यांच्या समस्या आणि अनुभवांवर मोकळेपणाने चर्चा होईल, अशा विचारमंथनपर कार्यक्रमांना प्राधान्य दिले जाईल. तसेच महिलांच्या विविध कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणारे उपक्रम राबविण्यात येतील. महिलांसाठी समुपदेशन, व्यक्तिमत्व विकास, आरोग्य जागरूकता तसेच कार्यस्थळी येणाऱ्या अडचणींवर मार्गदर्शन करणाऱ्या कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात येईल. पुढील महिला दिन अधिक अर्थपूर्ण आणि उपयुक्त ठरावा यासाठी आतापासूनच सविस्तर अहवाल तयार करून नियोजनबद्ध पद्धतीने कार्यक्रम आखले जातील. महिलांना सक्षम, आत्मविश्वासू आणि समाजजीवनात अधिक सक्रिय बनविण्यासाठी महानगरपालिका स्तरावर सातत्याने सकारात्मक उपक्रम राबविण्याचा प्रयत्न राहील, असे विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर म्हणाले.

महिला दिनाच्या कार्यक्रमाची सुरुवात महापालिकेच्या कर्मचारी महिलांच्या गुणदर्शन कार्यक्रमाने करण्यात आली. यामध्ये कर्मचारी वर्गाने समुह नृत्य सादर केले. तर लकी ड्रॉ मध्ये पैठणीचे बक्षिस आणि सोलो डान्स देखील यावेळी महिलांनी सादर केला. याशिवाय, महिला कर्मचाऱ्यांच्या आरोग्य तपासणीसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे देखील आयोजन करण्यात आले होते.

# पिंपरी-चिंचवडमध्ये 'आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठा'ची मागणी

## शहरातील क्रीडा पायाभूत सुविधांना चालना देण्यासाठी आमदार अमित गोरखे यांनी सभागृहात सरकारचे लक्ष वेधले

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड ही केवळ औद्योगिक आणि सांस्कृतिक नगरीच नाही, तर आता ती जागतिक दर्जाचे खेळाडू घडवणारी 'क्रीडा पंढरी' म्हणून ओळखली जावी, या उद्देशाने आमदार अमित गोरखे यांनी विधान परिषदेत महत्त्वपूर्ण मागणी केली आहे. शहराच्या मध्यवर्ती भागातील रिक्त असलेल्या महानगरपालिकेच्या भूखंडांवर 'आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ' उभारण्याबाबत शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, असा औचित्याचा मुद्दा आमदार अमित गोरखे यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात मांडला.



आपली भूमिका मांडताना आमदार अमित गोरखे म्हणाले की, पिंपरी-चिंचवड शहर हे मुंबई आणि पुणे या दोन महत्त्वाच्या शहरांच्या मध्यभागी असून अत्यंत वेगाने विकसित होत आहे. शहरात रेल्वे, मेट्रो आणि रस्ते वाहतुकीचे उत्तम जाळे उपलब्ध आहे. प्रशासन आणि दळणवळणाची सर्व केंद्रे शहराच्या मध्यवर्ती भागात आहेत. शैक्षणिक क्षेत्रातही हे शहर अग्रेसर असून लाखो विद्यार्थी येथे शिक्षण घेत आहेत. अशा वेळी शहराच्या मध्यवर्ती भागातील रस्त्यालगत असलेले महानगरपालिकेचे रिक्त भूखंड क्रीडा विद्यापीठासाठी अत्यंत योग्य आणि सर्वसमावेशक आहेत.

### भविष्यातील ऑलिम्पिक खेळाडूंचे केंद्र..

**» जर या रिक्त भूखंडांवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडा विद्यापीठ उभारले, तर केवळ राज्यासाठीच नव्हे तर देशासाठी मोलाचे योगदान देणारे खेळाडू येथून घडतील. जागतिक दर्जाच्या सुविधा एकाच छताखाली उपलब्ध झाल्यामुळे स्थानिक प्रतिभेला आंतरराष्ट्रीय व्यासपीठ मिळेल, असा विश्वास आमदार अमित गोरखे यांनी व्यक्त केला.**

आमदार अमित गोरखे यांनी या विषयाचे गांभीर्य ओळखून गेल्या दोन महिन्यांपासून शासनाकडे पत्रव्यवहार केला आहे. मी दोन महिन्यांपूर्वीच ख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विशेष पत्राद्वारे या संदर्भात पत्रव्यवहार करून मागणी केली होती. आज सभागृहात औचित्याच्या मुद्द्याद्वारे मी पुन्हा सरकारचे लक्ष वेधले असून, सरकारने यावर सकारात्मक निर्णय घ्यावा, असे आमदार अमित गोरखे यांनी नमूद केले.

# पुणे महापालिकेचा 13,995 कोटींचा अर्थसंकल्प

## शहराच्या सर्वांगीण विकासासाठी पायाभूत सुविधा, सार्वजनिक वाहतूक व पर्यावरण संवर्धनावर भर

**पुणे | प्रतिनिधी**

चार वर्षांच्या प्रशासकीय राजवटीनंतर महापालिकेचे लोकनियुक्त सभागृह आणि स्थायी समिति अस्तित्वात आल्याने यंदाच्या अंदाजपत्रकाकडे सर्वांचे लक्ष लागले होते. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठीचे १३ हजार ९९५ कोटी रुपयांचे प्रशासकीय अंदाजपत्रक आज स्थायी समितीला सादर केले. गेल्या काही वर्षांपासून पालिकेचा कारभार प्रशासकांमार्फत सुरू होता. मात्र, आता स्थायी समितीची स्थापना झाल्याने आयुक्तांनी हे अंदाजपत्रक समितीसमोर मांडले. मागील वर्षांच्या तुलनेत यंदाच्या अंदाजपत्रकाच्या आकड्यात वाढ झाली असून, पायाभूत सोयीसुविधांच्या अंमलबजावणीवर प्रशासनाचा भर राहणार असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले.

महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाचे प्रशासनाचे अंदाजपत्रक स्थायी समितीला सादर केले आहे. चार वर्षांच्या प्रशासक राजनंतर महापालिकेचे लोकनियुक्त सभागृह अस्तित्वात येऊन स्थायी समिति निर्माण झाली आहे. त्यामुळे महापालिका आयुक्त नवल किशोर राम हे सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाचे प्रशासनाने तयार केलेले अंदाजपत्रक स्थायी समितीला सादर केले. यंदा १३ हजार ९९५ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक स्थायी समितीला सादर केले आहे.




### पथ विभाग आणि वाहतूक नियोजन

» शहरातील रस्ते जाळे सक्षम करण्यासाठी आणि वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी पथ आणि प्रकल्प विभागामार्फत विविध तरतुदी करण्यात आल्या आहेत. कात्रज-कोंढवा रस्त्याच्या विकासासाठी १०० कोटी रुपयांची स्वतंत्र तरतूद करण्यात आली आहे. शहरातील ३२ मिसिंग लिंक रस्त्यांपैकी १२ रस्ते यावर्षी ताब्यात घेऊन विकसित करण्याचे नियोजन आहे. सर्वंकष वाहतूक आराखड्याअंतर्गत २०३४ पर्यंतच्या गरजा लक्षात घेऊन महामेट्रोच्या सहकार्याने उड्डाणपूल आणि पुलांचे नियोजन करण्यात येणार आहे. तसेच वाहतूक डेटा विश्लेषणासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पार्किंग व्यवस्थापनासाठी जीआयएस मॅपिंगचा वापर करण्याची योजना आहे.

### गृहनिर्माण आणि सांस्कृतिक वारसा

» प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत बालेवाडी, हडपसर आणि इतर भागात सुमारे ४७०० घरांचे नियोजन करण्यात आले आहे. नवीन प्रकल्पांसाठी ३५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. शहरातील बालगंधर्व रंगमंदिराचे आधुनिकीकरण आणि पुनर्विकास करण्याचा प्रस्ताव असून, महापालिकेच्या ७५ शाळा 'आदर्श शाळा' म्हणून विकसित करण्याचे नियोजन आहे.

### सार्वजनिक वाहतूक

» पुणेकरांच्या प्रवासासाठी सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम करण्यासाठी पीएमपीएमएलच्या माध्यमातून १००० नवीन ई-बसेस भाडेतत्त्वावर ताफ्यात सामील केल्या जाणार आहेत. या बसेस केंद्र शासनाच्या फेम-२ योजनेअंतर्गत उपलब्ध होणार आहेत. बीआरटी स्थानकांवर सुरक्षारक्षक, सीसीटीव्ही कॅमेरे तसेच वॉटर जेट मशीनद्वारे स्वच्छतेची व्यवस्था करण्याचेही नियोजन करण्यात आले आहे.

### पर्यावरण आणि नदी संवर्धन

» मुळा-मुठा नदीतील प्रदूषण कमी करण्यासाठी मैलापाणी शुद्धीकरण केंद्रांची क्षमता सध्याच्या ४७३ एमएलडीवरून जवळपास दुप्पट करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. कोंढवा खुर्द येथे ३.८ एकर जागेवर नेचर बेस्ड फॅमिली पार्क विकसित करण्याची योजना आहे. तसेच शहरातील हवेची गुणवत्ता मोजण्यासाठी विविध ठिकाणी एअर क्वालिटी मॉनिटरिंग सेन्सर्स बसवण्यात येणार आहेत.

### घनकचरा व्यवस्थापन

» देवाची उरुळी येथील सुमारे १० लाख मेट्रिक टन कचऱ्यावर बायोमायनिंगद्वारे प्रक्रिया करण्याचे काम अंतिम टप्प्यात असून, रिजेक्ट कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी हडपसर येथे नवीन प्रकल्प उभारण्याचे नियोजन आहे. महिला आणि तृतीयपंथीयांसाठी विशेष सोयींनी युक्त स्मार्ट सार्वजनिक स्वच्छतागृहे विविध झोनमध्ये उभारण्याचीही तरतूद करण्यात आली आहे.

# डॉ. अभिजीत चौधरी यांनी स्वीकारला 'पीएमआरडीए'च्या महानगर आयुक्तपदाचा पदभार

## पुणे महानगर प्रदेशाच्या विकासाला गती देणार : डॉ. अभिजीत चौधरी

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (पीएमआरडीए) नूतन महानगर आयुक्त म्हणून डॉ. अभिजीत चौधरी (IAS) यांनी सोमवारी (दि.9) अधिकृतपणे पदभार स्वीकारला. मावळते महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांच्याकडून त्यांनी सूत्रे हाती घेतली. पदभार स्वीकारल्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना डॉ. चौधरी यांनी पुणे महानगर क्षेत्राच्या सुसूत्र नियोजनासह रिंग रोड आणि मेट्रो प्रकल्पांना गती देण्याचा निर्धार व्यक्त केला.




यापप्रसंगी अतिरिक्त महानगर आयुक्त दीपक सिंगला, सहआयुक्त (प्रशासन) रुपाली आवले-डंबे यांची प्रमुख उपस्थिती होती. मावळते महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे व अतिरिक्त महानगर आयुक्त दीपक सिंगला यांनी डॉ. चौधरी यांचे स्वागत करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

डॉ. अभिजीत चौधरी यांचा प्रशासकीय सेवेतील १५ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव पाहता, त्यांच्या नेतृत्वाखाली 'पीएमआरडीए'च्या प्रलंबित प्रकल्पांना गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. भविष्यातील समृद्ध, उद्योगक्षम आणि राहण्यायोग्य 'सर्वांगसुंदर महानगर' घडवण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

### प्रलंबित प्रकल्पांना गती देण्यावर भर

» नवीन महानगर आयुक्त म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर डॉ. अभिजीत चौधरी यांनी पीएमआरडीएच्या महत्त्वाच्या प्रलंबित प्रकल्पांना गती देण्यावर भर देणार असल्याचे स्पष्ट केले. पुणे रिंग रोड, हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो, टाऊन प्लॅनिंग स्कीम्स (टीपीएस) तसेच नदी सुधार प्रकल्पांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील. वाढत्या शहरीकरणामुळे निर्माण होणाऱ्या वाहतूक आणि पायाभूत सुविधांच्या समस्यांवरही प्राधान्याने उपाययोजना करण्यात येणार आहेत. तसेच भूसंपादन आणि परतावा जमिनींसंदर्भातील शेतकऱ्यांचे प्रश्न समन्वयाने सोडवण्यावरही प्रशासनाचा भर राहणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

# कात्रज–कोंढवा रस्त्यासाठी आता सक्तीचे भूसंपादन

## 31 मार्चपर्यंत प्रक्रिया पूर्ण करण्याचे जिल्हा प्रशासनाचे नितीन गडकरींना आश्वासन

**पुणे | प्रतिनिधी**

कात्रज-कोंढवा रस्त्याच्या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या रुंदीकरण प्रकल्पासाठी आता सक्तीच्या भूसंपादनाचा मार्ग स्वीकारण्यात येणार आहे. येत्या ३१ मार्चपर्यंत भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करण्याचे आश्वासन जिल्हा प्रशासनाने केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना दिले आहे.

गडकरी यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत जिल्हा प्रशासनाने ही माहिती दिली. गडकरी यांनी नुकतीच जिल्हा प्रशासन आणि संबंधित यंत्रणांची आढावा बैठक घेत जिल्ह्यातील तसेच पुणे शहरातील प्रमुख रस्ते आणि उड्डाणपुलांच्या कामांची प्रगती तपासली. या बैठकीत विशेषत: कात्रज-कोंढवा रस्त्याच्या रुंदीकरणाच्या कामावर आणि कात्रज चौकातील उड्डाणपुलाच्या कामाच्या सद्यस्थितीवर सविस्तर चर्चा करण्यात आली. अनेक वर्षांपासून रखडलेल्या या प्रकल्पामुळे परिसरातील वाहतूक कोंडी गंभीर होत असून त्यावर तातडीने तोडगा काढण्याची गरज व्यक्त करण्यात आली.

कात्रज चौकातील उड्डाणपुलाचे काम सध्या काही तांत्रिक अडचणींमुळे मंदावल्याचे गडकरी यांनी बैठकीत नमूद केले. राजस सोसायटी परिसरातील चौकात रॅम्प उभारण्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध नसल्याने काम रखडल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच या ठिकाणी आवश्यक भूसंपादन करण्याची जबाबदारी पुणे महापालिकेची असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

जिल्हा प्रशासनाने भूसंपादनासंदर्भातील प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे पाठविले आहेत. आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून येत्या ३१ मार्चपर्यंत भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल, अशी माहितीही या बैठकीत देण्यात आली. या प्रक्रियेला गती दिल्यास कात्रज-कोंढवा रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम प्रत्यक्षात सुरू होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

कात्रज-कोंढवा मार्ग हा पुणे शहरातील अत्यंत महत्त्वाचा वाहतूक दुवा मानला जातो. या मार्गाव र दररोज मोठ्या प्रमाणावर वाहनांची ये-जा होत असून रस्त्याची अरुंद रुंदी आणि वाढती वाहतूक यामुळे सतत कोंडीची समस्या निर्माण होते. रस्त्याचे रुंदीकरण आणि उड्डाणपुलाचे काम पूर्ण झाल्यास या भागातील वाहतूक सुरळीत होणार आहे.

ही अडचण दूर करण्यासाठी आता प्रशासनाने सक्तीच्या भूसंपादनाचा निर्णय घेतला आहे. संबंधित जमीनमालकांना कायद्यानुसार मोबदला देत ही प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. भूसंपादनाच्या मोबदल्यासाठी सुमारे १३६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून ही रक्कम जिल्हा प्रशासनाकडे वर्ग करण्यात आली आहे.



### ...म्हणून सक्तीच्या भूसंपादनाचा निर्णय

» महापालिका आयुक्त नवलकिशोर राम आणि जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी प्रकल्पाबाबत सविस्तर माहिती सादर केली. राजस सोसायटी ते कोंढवा खडीमशीन या दरम्यानचा रस्ता ५० मीटर रुंद करण्यात येणार असून त्यासाठी मोठ्या प्रमाणावर भूसंपादन आवश्यक आहे. या परिसरातील काही जमीनमालकांशी तडजोडीच्या माध्यमातून जमीन संपादन करण्याचा प्रयत्न प्रशासनाने केला होता. मात्र काही ठिकाणी जमीनमालकांशी योग्य तो समझोता न झाल्याने भूसंपादन प्रक्रिया अडथळ्यात आली होती.

### भूसंपादनाला गती

» कात्रज-कोंढवा रस्त्याच्या दीर्घकाळ प्रलंबित रुंदीकरण प्रकल्पासाठी आता सक्तीच्या भूसंपादनाचा मार्ग स्वीकारण्यात येणार आहे. जिल्हा प्रशासनाने भूसंपादनासंदर्भातील प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे पाठवले असून आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून ३१ मार्चपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. या प्रकल्पामुळे परिसरातील वाहतूक कोंडी कमी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. भूसंपादन पूर्ण झाल्यानंतर रस्त्याच्या रुंदीकरणाचे प्रत्यक्ष काम सुरू होण्याचा मार्ग मोकळा होणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### १३६ कोटींची तरतूद

» कात्रज-कोंढवा मार्ग हा शहरातील महत्त्वाचा वाहतूक दुवा मानला जातो. अरुंद रस्ता आणि वाढती वाहनसंख्या यामुळे या भागात दररोज मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होते. तसेच कात्रज चौकातील उड्डाणपुलाच्या कामालाही काही ठिकाणी जागेअभावी अडथळे येत आहेत. त्यामुळे प्रशासनाने भूसंपादनाची प्रक्रिया गतीने पूर्ण करण्याचा निर्णय घेतला आहे. संबंधित जमीनमालकांना कायद्यानुसार मोबदला देण्यात येणार असून त्यासाठी सुमारे १३६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

# मार्केट यार्डातील कामगारांचा मोठा निर्णय, 50 किलोंपेक्षा जास्त शेतीमालाची चढ-उतार नाही’

## कामगारांचा निर्णय; नियम न पाळल्यास बाजाराचे कामकाज बंद ठेवण्याचा इशारा

**पुणे | प्रतिनिधी**

श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील फळभाजी, कांदा-बटाटा विभागात मंगळवारपासून (१० मार्च) ५० किलोपेक्षा जास्त वजनाच्या शेतीमालाची चढ-उतार न करण्याचा निर्णय कामगारांनी घेतला आहे.

‘आंतरराष्ट्रीय कामगार संघटना, केंद्र शासन, राज्य शासन, कामगार आयुक्त कार्यालय, तसेच बाजार समितीने यापूर्वी परिपत्रकाद्वारे पोते, गोणीत ५० किलोंपेक्षा जास्त शेतीमाल भरण्यात येऊ नये, असा नियम लागून केला होता. मात्र, गेल्या आठ वर्षांपासून संबंधित निर्णय कागदावरच होता. त्याची अंमलबजावणी झाली नव्हती. या पार्श्वभूमीवर रविवारी (८ मार्च) मार्केट यार्डातील कामगार, वारणार, भरणार, तोलणार, तसेच महिला कामगारांची बैठक झाली.

श्री छत्रपती शिवाजी महाराज कामगार युनियचे अध्यक्ष संतोष नांगरे, सचिव विशाल केकाणे, संजय साष्टे, भरत शेळके, अमर रणदिवे, आबू जाधव, शशिकांत शिंदे, गणेश शिर्के, महेंद्र केकाणे, संतोषी शिवशरण, संतोष ताकवले, शाम शितोळे, संतोष भाडले यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.’ या बैठकीत ५० किलोपेक्षा जास्त वजन न उचलण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला. ६५ ते ७५ किलोपर्यंतच्या वजनाच्या पोत्यांमुळे कामगारांना मणके आणि गुडघेदुखीचा त्रास होत आहेत. तंगूस (प्लास्टिक सदृश) बारदानामुळे लोखंडी हूक सुटून दुखापती होत आहेत.

त्यामुळे लावणार, वारणार, गाळा कामगार गाळ्यांवर काम करण्यास तयार नाहीत. अनेक जण राजीनामे देत आहेत. नवीन कामगारही अशा प्रकारचे काम करण्यास तयार होत नाहीत. त्यामुळे ५० किलोंपेक्षा अधिक वजनाचा शेतीमालाची चढउतार न करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



### कामगारांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

» मार्केट यार्डात अनेक वर्षांपासून ६५ ते ७५ किलो वजनाची पोती उचलावी लागत असल्याने कामगारांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याची तक्रार आहे. जड पोती उचलताना अनेकांना मणकेदुखी, गुडघेदुखी आणि इतर शारीरिक त्रासांना सामोरे जावे लागत आहे. तसेच तंगूस बारदानामुळे लोखंडी हूक सुटून दुखापती होण्याचे प्रकारही घडत आहेत. या पार्श्वभूमीवर कामगारांनी ५० किलोपेक्षा अधिक वजनाची पोती उचलण्यास नकार देण्याचा निर्णय घेतला आहे. नियमाप्रमाणे वजन मर्यादा पाळली नाही, तर बाजारातील कामकाज बंद ठेवण्याचा इशाराही कामगार संघटनांनी दिला आहे.